(महाराष्ट्र शासन)

**Rajarshee Chhatrapati Shahu Maharaj Government Medical College, Kolhapur**

**राजर्षि छत्रपती शाहु महाराज शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, कोल्हापूर.**

**(अधिष्ठाता यांचे कार्यालय)**

Tel: - (0231) 2641583 E-mail:-rcsmlib@yahoo.in Website: -rcsmgmc.ac.in

जा.क्र./पदव्युत्तर/वरिष्ठ निवासी/जाहिरात/ ५४८२ /२०२३ दिनांक:- २५/०९/२०२३

## :- वरिष्ठ निवासी पदांची जाहिरात -:

**विषय :- वरिष्ठ निवासी रिक्त पदे थेट मुलाखतीद्वारे (WALK IN INTERVIEW) भरण्याबाबत...**

राजर्षि छत्रपती शाहु महाराज शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, कोल्हापुर संलग्नित छत्रपती प्रमिलाराजे सर्वोपचार रुग्णालय, कोल्हापूर येथील वरिष्ठ निवासी संवर्गातील रिक्त पदे **थेट मुलाखतीद्वारे (WALK IN INTERVIEW)** स्थानिक निवड समितीमार्फत निव्वळ **तात्पुरत्या स्वरुपात ६ महिन्याकरिता** भरण्यासाठी अर्हताप्राप्त प्राप्त उमेदवारांकडून विहित नमुन्यात अर्ज मागविण्यात येत आहेत.

तरी इच्छुक उमेद्वारांनी रु. २५०/- प्रती अर्ज शुल्क रोखापाल, राजर्षी छत्रपती शाहू महाराज शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, कोल्हापूर यांचेकडे भरणा करुन पदव्युत्तर विभागातून विहित नमुन्यातील अर्ज घ्यावा. सदर **अर्ज भरुन जाहिरातीमध्ये नमुद केलेल्या कागदपत्राच्या छायांकीत प्रतीच्या एका संचासह बुधवार दिनांक:- २७/०९/२०२३ ते दिनांक:- ०३/१०/२०२३ रोजी दुपारी १२.०० वाजेपर्यंत पदव्युत्तर विभागात जमा करण्यात यावा. अर्ज जमा केलेल्या उमेद्वारांनी मुळ प्रमाणपत्रासह बुधवार दिनांक:- ०३/१०/२०२३ रोजी दुपारी ३.३० वाजता वाजता अधिष्ठाता कार्यालय, राजर्षी छत्रपती शाहू महाराज शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, शेंडा पार्क, कोल्हापूर येथे मुलाखतीसाठी उपस्थित रहावे**. या पुर्वी सादर केलेल्या अर्जांचा विचार केला जाणार नाही. सध्या कार्यरत असलेल्या उमेद्वारांनी संबंधित विभागप्रमुख यांच्या शिफारशीसह अर्ज सादर करावा.

**वरिष्ठ निवासी रिक्त पदांच्या विषयनिहाय तपशिल**

| अं.क्र. | विभागाचे नांव | रिक्त जागा |
|---|---|---|
| ०१. | बालरोगचिकित्साशास्त्र | ३ |
| ०२. | मनोविकृतीशास्त्र | २ |
| ०३. | औषधवैद्यकशास्त्र | ४ |
| ०४. | न्यायवैद्यकशास्त्र | ३ |
| ०५. | अस्थिव्यंगोपचारशास्त्र | १ |
| ०६. | त्वचा व गुप्तरोगशास्त्र | १ |
| ०७. | शरीरक्रियाशास्त्र | ४ |
| ०८. | जनऔषधवैद्यकशास्त्र | २ |
| ०९. | सुक्ष्मजीवशास्त्र | ५ |
| १०. | औषधशास्त्र | ४ |
| ११. | जीवरसायणशास्त्र | ५ |
| १२. | शरीरविकृतीशास्त्र | २ |
| १३. | शरीररचनाशास्त्र | ६ |
| १४. | दंतशल्यचिकित्साशास्त्र | १ |
| १५. | इर्मजन्सी मेडिसीन | ९ |
| | एकुण | ५२ |

- **शैक्षणिक आर्हता:- संबधित विषयात मान्यताप्राप्त विद्यापीठाची एम.डी./एम.एस./डी.एन.बी. अभ्यासक्रम उत्तीर्ण. पदव्युत्तर पदवी उत्तीर्ण धारकास प्राध्यान्य देण्यात येईल.**
- तसेच शासन निर्णयानुसार बंधपत्रित उमेद्वारांना प्राध्यान्य देण्यात येईल.
- मुलाखतीचे ठिकाण:- **अधिष्ठाता बैठक हॉल, अधिष्ठाता कार्यालय, शेंडा पार्क, रा.छ.शा.म.शा.वै.म.कोल्हापूर.**
- सदर जाहिरात प्रक्रियेबाबतची वेळोवेळी अद्यावत माहिती या महाविद्यालयाचे संकेतस्थळ www.rcsmgmc.ac.in वर उपलब्ध आहे.

R.C.S.M. Govt. Medical College Kolhapur

अधिष्ठाता
DEAN,
R.C.S.M. Govt. Medical College
Kolhapur.

## अटी व शर्ती

०१) **शैक्षणिक आर्हता:- संबधित विषयात मान्यताप्राप्त विद्यापीठाची एम.डी./एम.एस./डी.एन.बी. अभ्यासक्रम उत्तीर्ण. पदव्युत्तर पदवी उत्तीर्ण धारकास प्राध्यान्य देण्यात येईल.**

०२) तसेच शासन निर्णयानुसार बंधपत्रित उमेद्‌वारांना प्राध्यान्य देण्यात येईल.

०३) महाराष्ट्र मेडीकल कौन्सीलची कायम नोंदणी आवश्यक.

०४) **वेतन:-** शा.नि.क्रं.एमईडी२००८/प्र.क्र.३९३/शिक्षण-२दि.०२/१२/२०१३ नुसार वरिष्ठ निवासी रु. २५०००/- मुळ वेतन व त्यावरील प्रचलित दराने देय होणारा महागाई भत्ता असे ठोक (एकत्रित) मानधन अनुज्ञेय राहील.

०५) **वयोमर्यादा :-** मुलाखतीच्या दिवशी उमेदवारांचे **वय ४५** वर्षापेक्षा जास्त नसावे.

०६) **आवश्यक प्रमाणपत्रे :-** अर्जासोबत खालील प्रमाणपत्रांच्या साक्षांकित प्रती जोडणे आवश्यक आहे अन्यथा अर्जाचा विचार केला जाणार नाही.

१) एमबीबीएस ची सर्व गुणपत्रके व प्रयत्न प्रमाणपत्र, आंतरवासियाता प्रमाणपत्र, पासिंग व डिग्री प्रमाणपत्र.
२) एम.डी./ एम.एस./डी.एन.बी. परीक्षा गुणपत्रिका, पासिंग प्रमाणपत्र, डिग्री प्रमाणपत्र व प्रयत्न प्रमाणपत्र.
३) एमबीबीएस व एम.डी./ एम.एस./डी.एन.बी. एमएमसी नोंदणी प्रमाणपत्र तसेच आवश्यक असल्यास नोंदणीचे नुतनीकरण.
४) बंधपत्र प्रमाणपत्र.
५) अनुभव प्रमाणपत्र.
६) मागासवर्गीय उमेदवारांसाठी जातीचे प्रमाणपत्र व जात वैधता प्रमाणपत्र.
७) विजा अ, भज ब, भज क, इमाव तसेच विमाप्र प्रवर्गातील उमेद्‌वारांसाठी दि.३१/०३/२०२४ पर्यंत वैध असलेले उन्नत गटात मोडत नसल्याबाबतचे नॉन क्रिमिलेअर प्रमाणपत्र आवश्यक.
८) जन्म तारखेकरीता एसएससी प्रमाणपत्र.
९) नावात बदले असल्यास गॅझेटची प्रत.
१०) आधार कार्ड व पॅन कार्डची प्रत.

०७) **नियुक्तीचा कालावधी:-** वरिष्ठ निवासी पदाकरीता उमेदवाराची नियुक्ती **६ महिन्याकरिता** अस्थाई स्वरुपाची राहील व उमेदवारांचे काम समाधानकारक नसल्यास कोणतीही पुर्वसुचना न देता सेवा समाप्त करण्यात येईल. रुजू होतेवेळेस एक महिन्याचे एकत्रित वेतन (अनामत रक्कम) जमा करावे लागेल व पुर्व सुचना न देता राजीनामा दिल्यास अनामत रक्कम परत मिळणार नाही. या पुर्वी या शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व सर्वोपचार रुग्णालय येथे काम करीत असतांना आपले काम असमाधानकारक असल्यामुळे जर आपली नियुक्ती रद्द केली असल्यास आपल्या अर्जाचा विचार करण्यांत येणार नाही.

०८) **अर्जाची किंमत:-** वरिष्ठ निवासी पदांच्या अर्जाची किंमत **रु. २५०/-** आहे. रोखपाल महाविद्यालय यांचेकडे रोख रु.२५०/- भरणा केल्यानंतर अर्जाचा पुरवठा करण्यांत येईल.

०९) मुलाखतीच्या वेळेस वरील सर्व मुळ प्रमाणपत्रे उमेद्‌वारांनी सादर करणे बंधनकारक राहील. तथापि उमेद्‌वार मुळ प्रमाणपत्रे सादर करण्यास असमर्थ असल्यास संबंधित प्रमाणपत्र सादर करण्यासाठी मुदत देण्यासाठीचा निर्णय संस्थाप्रमुखांनी राखून ठेवला आहे. तो उमेद्‌वारास बंधनकारक राहील.

१०) वरील जाहिरातीमधील पदांच्या संख्येत कमी / अधिक करण्यांचा तसेच निवड समिती मार्फत निवड झालेल्या उमेदवारांचे नियुक्ती आदेश निर्गमित करण्याचा अथवा प्रलंबित ठेवण्याचा अथवा नियुक्ती रद्द करण्याचा अथवा पदांमध्ये बदल अथवा जाहिरात रद्द करण्याचे सर्व अधिकार अधिष्ठाता, राजर्षि छत्रपती शाहु महाराज शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, कोल्हापुर यांनी राखुन ठेवण्यात आलेले आहेत.

अधिष्ठाता,
राजर्षि छत्रपती शाहु महाराज
शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, कोल्हापुर.

प्रत माहिती व पुढील कार्यवाहीसाठी
१) संकेतस्थळ www.rcsmgmc.ac.in
२) सर्व संबंधित प्राध्यापक व विभागप्रमुख, राजर्षी छत्रपती शाहु महाराज शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, कोल्हापुर.
३) नोटीस बोर्ड अधिष्ठाता कार्यालय.

प्रत :- मा. संचालक, वैद्यकीय शिक्षण व संधोधन, मुंबई यांना माहितीस्तव सविनय सादर.

प्रत:- अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालये.